सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १३२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ४ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# केजरीवालांनी पंतप्रधान निवासस्थानापर्यंत मोर्चा काढला

## पोलिसांनी रोखले; फिरोजशहा रोडवर धरला ठिय्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ नवी दिल्ली** - E२० इंधनाच्या विरोधात निषेध करण्यासाठी दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे (AAP) संयोजक अरविंद केजरीवाल यांनी मंगळवारी पंतप्रधान निवासस्थानाकडे मोर्चा काढला. मात्र, दिल्ली पोलिसांनी केजरीवाल, मनीष सिसोदिया, जस्मिन शाह आणि पक्षाच्या इतर नेत्यांना फिरोजशाह रोडवरच अडवले. त्यानंतर, केजरीवाल आणि 'आप'च्या इतर नेत्यांनी फिरोजशाह रोडच्या मध्यभागीच ठिय्या आंदोलन केले. 'आप'ने सुमारे १०० नेते आणि कार्यकर्त्यांसह हा मोर्चा आयोजित केला होता. देशभरातील २.३० लाखांहून अधिक लोकांकडून निवेदने गोळा केल्याचा दावा पक्षाने केला आहे; ही निवेदने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सादर करायची होती.

मोर्चादरम्यान केजरीवाल यांनी सांगितले की, २ लाखांहून अधिक लोकांनी E२० इंधनाला विरोध करणारी पत्रे पंतप्रधानांना लिहिली आहेत आणि त्यांना ती पत्रे स्वतः पंतप्रधानांच्या हाती सोपवायची आहेत. केजरीवाल यांनी पंतप्रधानांना संदेश पाठवल्याचे नमूद केले आणि पंतप्रधान आम्हाला भेटतील अशी आम्हाला आशा आहे, असेही ते म्हणाले.

E२० विरोधातील एका आंदोलनादरम्यान, अरविंद केजरीवाल यांनी आरोप केला की मोदी सरकार ट्रम्प यांच्या दबावाखाली अमेरिकेकडून इथेनॉल खरेदी करत आहे. अमेरिका हा जगातील सर्वात मोठा इथेनॉल उत्पादक देश असून, त्यांनी भारतावर ते खरेदी करण्यासाठी दबाव आणला आहे. केजरीवाल यांनी सांगितले की, त्यांनी गेल्या महिन्यात पंतप्रधानांना पत्र लिहिले होते. ज्यात ए२० पेट्रोलशी संबंधित चिंतांवर चर्चा करण्यासाठी वेळ मागितला होता.केजरीवाल यांचा दावा आहे की, त्यांना या पत्राचे कोणतेही उत्तर मिळाले नाही. त्यामुळे आता ते स्वतः पंतप्रधान निवासस्थानी जाऊन जनतेने स्वाक्षरी केलेल्या याचिका सुपूर्द करतील.आम आदमी पार्टीच्या संयोजकांनी ही मागणी देखील केली आहे की, पेट्रोल पंपांवर शुद्ध पेट्रोल आणि E२० दोन्हीचे पर्याय उपलब्ध असावेत. E२० पेट्रोलच्या किमती कमी केल्या जाव्यात. केजरीवाल




यांनी म्हटले की, अमेरिकेतील टाकाऊ पदार्थ खरेदी करून ते आपल्या ३० लाख वाहनांवर लादले जात आहेत. हे रोखण्यासाठी छएएढ आंदोलना पेक्षाही मोठी चळवळ उभारणे आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करत, ए२० धोरणाविरुद्धचा आपला लढा सुरूच राहील, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

### भाजपने म्हटले- केजरीवाल अराजकतेचे राजकारण करत आहेत

दिल्ली भाजप अध्यक्ष हर्ष मल्होत्रा यांनी केजरीवाल यांच्या मोर्चाच्या घोषणेवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले की, काँग्रेस आणि केजरीवाल यांच्यात देशातील नंबर १ अराजकतावादी बनण्याची ही स्पर्धा आहे.

मल्होत्रा यांनी आरोप केला की, काँग्रेसने पंतप्रधान निवासस्थानी आंदोलन केल्यापासून केजरीवाल स्वतःला मागे पडल्याचे समजत आहेत. परवानगीशिवाय धरणे-प्रदर्शन करणे आणि नंतर पीडित असल्याचा आव आणणे ही केजरीवाल यांची जुनी राजकीय शैली आहे.त्यांनी दावा केला की, जेव्हा पोलीस त्यांना परवानगीशिवाय पंतप्रधान निवासस्थानी घुसण्यापासून रोखतील, तेव्हा केजरीवाल पुन्हा म्हणतील की सरकारने त्यांच्याशी बोलण्यास नकार दिला.

# शिवसेना कुणाची?: सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी नाही

## उद्धव ठाकरेंच्या याचिकेवर उद्या होणार सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ नवी दिल्ली-** शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादासंदर्भातील महत्त्वाच्या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी सुनावणी होऊ शकली नाही. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहन यांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण आले असता, वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी तयारीसाठी काही वेळ देण्याची विनंती केली. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी बुधवारी घेण्याचे निश्चित केले.

उद्धव ठाकरे यांनी भारत निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या गटाला अधिकृत शिवसेना म्हणून दिलेल्या मान्यतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. याचबरोबर शिवसेनेचे नेते सुनील




प्रभू यांनी महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांनी शिंदे गटाच्या आमदारांना अपात्र ठरविण्यास नकार दिलेल्या निर्णयाविरोधात दाखल केलेली याचिकाही सुनावणीसाठी सूचीबद्ध आहे.

सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी, हे प्रकरण उद्या घेऊ का? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी, होय, आम्हाला तयारीसाठी थोडा वेळ हवा आहे. शक्य असल्यास उद्या प्राधान्याने दुपारी २ वाजता सुनावणी घ्यावी, अशी विनंती केली.यावर सरन्यायाधीशांनी, प्रथम इतर प्रलंबित प्रकरणांचा विचार करावा लागेल, असे स्पष्ट केले. त्यानंतर सिब्बल यांनी, उद्या थोडा वेळ द्या. अन्यथा प्रत्येक वेळी आमचे नशीब साथ देत नाही, असे सांगितले. अखेरीस न्यायालयाने हे प्रकरण बुधवारी सुनावणीसाठी निश्चित केले.

उद्याच्या सुनावणीकडे लक्ष

शिवसेना पक्षाची अधिकृत मान्यता, धनुष्यबाण चिन्हावरील दावा आणि शिंदे गटाच्या आमदारांच्या अपात्रतेचा मुद्दा या प्रकरणाशी संबंधित असल्याने उद्याची सुनावणी राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे. महाराष्ट्राच्या राजकारणावर परिणाम करणाऱ्या या प्रकरणात सर्वोच्च न्यायालय कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# '..तर गुंगी गुडिया नसल्याचं सिद्ध करून दाखवा'

## टीकेचं समर्थन करत हर्षवर्धन सपकाळांचं सुनेत्रा पवारांना आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४मुंबई-** राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या प्रमुख सुनेत्रा पवार यांचा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अधिकृत अकाऊंटवरून गुंगी गुडिया असा उल्लेख करण्यात आल्याने वादाला तोंड फुटले आहे. तसेच काँग्रेसकडून करण्यात आलेल्या टीकेविरोधात अजित पवार गटाकडून तीव्र आंदोलन केलं जात आहे. मात्र सुनेत्रा पवारांवर केलेल्या या टीकेमुळे वातावरण तापलं असतानाच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मात्र या टीकेचं समर्थन केलं असून, सुनेत्रा पवार यांनी ही टीका सकारात्मकपणे घ्यावी आणि आपण गुंगी गुडिया नाही आहोत हे सिद्ध करून दाखवावं, असा सल्ला दिला आहे.

पक्षाच्या सोशल मीडिया अकाउंटवरून सुनेत्रा पवार यांच्यावर करण्यात आलेल्या टीकेचं समर्थन करताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, पत्रकारांनी प्रश्न विचारले पाहिजेत, तसेच नेत्यांनी त्यांची उत्तरं दिली पाहिजेत. समाजकारणात, राजकारणात आपल्यावर आरोप होत असतील तर त्याचीही उत्तरं दिली गेली पाहिजेत. मात्र काँग्रेस पक्षाने ज्या पत्रकार परिषदेच्या निमित्तानं हे ट्विट केलं, त्यामध्ये




त्यात पत्रकार प्रश्न विचारत आहेत आणि ज्यांच्यावर अनेक आरोप आहेत अशी व्यक्ती पत्रकारांना गप्प बसवताना दिसत आहे. अशावेळेस उपमुख्यमंत्री असलेल्या सुनेत्रा पवार ह्या एक शब्दही बोलताना दिसत नाही आहेत. त्यामुळे यातील मूळ मुद्दा हा त्यांच्या वर्तनाचा आहे. उपमुख्यमंत्रीपदावरील व्यक्ती पत्रकारांचे प्रश्न घेत नाही. तसेच एका वादग्रस्त व्यक्तीकडून पत्रकारांना गप्प बसवतात, हे लोकशाहीला आणि समाजजीवनाला अशोभनीय आहे. त्या अनुषंगाने गुंगी गुडिया हा शब्द प्रयोग केला आहे, असे त्यांनी सांगितले. हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, गुंगी गुडिया हा अपशब्द आहे का, गुंगी गुडिया ही शिवी आहे का, गुंगी गुडिया हा असंसदीय शब्द आहे का? तर हे वर्णन आहे. तसेच या शब्दात जे वर्णन आहे त्याच प्रमाणे तो शब्द उपमुख्यमंत्र्यांना लागू होत आहे. सुनेत्रा पवार ह्या अजितदादांच्या विमानाला झालेल्या अपघातापासून अनेक विषयांवर बोलत नाही. त्यामुळे सुनेत्रा पवार यांनी टीकेला समजून घ्यावं. त्यावरून गोंधळ घालण्याची किंवा आम्हाला शहाणपणा शिकवण्याची आवश्यकता नाही.

# दुसऱ्याच्या घरात लेकरू आणि पेढे संजय राऊत वाटतायत..

## बिहार निकालावरून भाजपचा ठाकरे गटासह रोहित पवारांवर पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ मुंबई-** बिहारमधील पोटनिवडणुकीच्या निकालांवरून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आनंदोत्सव साजरा केल्याने भारतीय जनता पक्षाने (इगझ) त्यांच्यावर सडकून टीका केली आहे. शेजारच्या घरात लेकरू झाल्यानंतर पेढे वाटण्याचा प्रकार संजय राऊत करत आहेत. आपला पक्ष वांझोटा राहिला आहे, याकडे त्यांनी लक्ष द्यावे, असा घणाघात भाजपचे प्रदेश प्रवक्ते नवनाथ बन यांनी केला. भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे गट, रोहित पवार आणि महाविकास आघाडीवर चौफेर फटकेबाजी केली.

दुसऱ्याच्या घरात लेकरू, राऊत वाटतायत पेढे

### रोहित पवारांना टोला- काठावर पास झालेल्यांनी मेरीटवर येणाऱ्यांवर बोलू नये

ईव्हीएम (एतच्) आणि निवडणूक प्रक्रियेवर शंका घेणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांच्यावरही नवनाथ बन यांनी पलटवार केला. निवडणूक आयोगाने प्रत्येक राजकीय पक्षाला आपला प्रतिनिधी (इड--२) नेमण्याचा अधिकार दिला आहे. मात्र, रोहित पवार यांच्याकडे आता माणसेच उरलेली नाहीत. विधानसभा निवडणुकीत ते स्वतः कसेबसे काठावर पास झाले आहेत. ज्यांच्याकडे बूथ प्रमुख आणि पन्ना प्रमुख नाहीत, त्यांची आता चिडचिड होत आहे. भाजपने लोकसभा आणि विधानसभा निवडणुका 'मेरीट'वर पास केल्या आहेत, त्यामुळे 'ढकलपास' झालेल्या रोहित पवारांनी आमच्यावर टीका करू नये, असा सणसणीत टोला त्यांनी लगावला.

बिहारमधील पोटनिवडणुकीत प्रशांत किशोर यांच्या पक्षाने मिळवलेल्या यशावर संजय राऊत



यांनी समाधान व्यक्त करत भाजपवर टीका केली होती. याला उत्तर देताना नवनाथ बन म्हणाले की, संजय राऊत ज्या काँग्रेस, जेडीयू आणि राजदची गुलामी करतात, त्या सर्वांचा बिहारमध्ये पराभव झाला आहे. इंडिया आघाडी तिथे पूर्णपणे हरली आहे. तरीही राऊत आनंद साजरा करत आहेत. गेल्या ४-५ वर्षांत ठाकरे गटाला सर्वच निवडणुकांमध्ये पराभव पत्करावा लागल्याने त्यांना सेलिब्रेशनची संधीच मिळाली नव्हती. त्यामुळे दुसऱ्याच्या घरात लेकरू झाल्यावर ते आता पेढे वाटत आहेत.महाराष्ट्रात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये ठाकरे गटाला ० जागा मिळाल्या होत्या, याची आठवणही त्यांनी यावेळी करून दिली. एका निवडणुकीतील पराभवाने नरेंद्र मोदी संपले, असा निकष जर राऊत लावत असतील, तर महाराष्ट्रात लोकसभा वगळता सर्वच निवडणुकांत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा सुपडा साफ झाला आहे, मग त्यांचा पक्ष संपला असे राऊत मान्य करणार का? असा सवालही बन यांनी उपस्थित केला.


# यवतमाळ जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरूच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४यवतमाळ :** पश्चिम विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याची 'शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा' ही कलंकित ओळख पुसण्याचे सर्व शासकीय दावे फोल ठरले आहेत. चालू वर्षात जानेवारी ते जून २०२६ या सहा महिन्यांत जिल्ह्यात तब्बल १५२ शेतकऱ्यांनी विविध कारणांमुळे आपली जीवनयात्रा संपवल्याची अत्यंत धक्कादायक आणि चिंताजनक आकडेवारी समोर आली आहे. निसर्गाचा लहरीपणा, वाढता उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा आणि प्रशासकीय अटी-नियम या दुष्टचक्रात अडकलेला इथला बळीराजा पूर्णपणे हतबल झाल्याचे विदारक चित्र आहे.

### तालुका, गाव आणि वयोगटनिहाय वास्तव

जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांचे हे लोण केवळ एका विशिष्ट भागात मर्यादित नसून जिल्ह्यातील बहुतांश ग्रामीण भागांत पसरले आहे. राळेगाव, मारेगाव, दारव्हा, पुसद, महागाव आणि यवतमाळ या तालुक्यांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण सर्वाधिक गंभीर आहे. ज्या गावांमध्ये सिंचनाची कोणतीही सोय नाही आणि पूर्णपणे कोरडवाहू कापूस-सोयाबीन पिकांवर मदार आहे, अशा अतिदुर्गम गावांमधील अल्पभूधारक शेतकरी या विळख्यात अधिक अडकत आहेत. आत्महत्या करणाऱ्यांमध्ये ३० ते ५० या वयोगटातील तरुण आणि कर्त्या शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. कुटुंबाची जबाबदारी, मुलांचे शिक्षण आणि अंगावरील कर्जाचा डोंगर यामुळे नैराश्यात आलेले तरुण शेतकरी टोकाचे पाऊल उचलत असल्याचे




आकडेवारीवरून दिसते. तसेच अल्पभूधारक आणि वृद्ध शेतकरीही आता आत्महत्यांकडे वळल्याचे विदारक चित्र आहे. बहुतांश शेतकरी शेतात फवारणीसाठी वापरण्यात येणारे विषारी कीटकनाशक पिऊन किंवा गळफास घेऊन जीवन संपवत असल्याचे निदर्शनास आले आहे. समाजात एकापाठोपाठ एक घडणाऱ्या अशा घटनांमुळे ग्रामीण भागात एक मानसोपचारात्मक संकट उभे ठाकले आहे.

### सहा महिन्यांत १५० तर, अडीच वर्षात ८०० आत्महत्या

चालू वर्षात जानेवारी ते जून या सहा महिन्यांच्या कालावधीत जिल्ह्यात तब्बल १५२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद प्रशासनाकडे आहे. यात जानेवारी महिन्यात २५, फेब्रुवारी-३१, मार्च-२७, एप्रिल-३१, मे-१६ आणि जून महिन्यात २२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. प्रशासनाच्या नोंदीनुसार, २०२४ मध्ये वर्षभरात ३०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. तर, २०२५ मध्ये यात वाढ होवून ही संख्या ३४२ वर पोहोचली. अडीच वर्षांत तब्बल ८०० च्या वर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याने प्रशासनाचे सर्व दावे आणि उपाययोजना फोल ठरल्याचा आरोप होत आहे.

प्रशासनाकडून आत्महत्यांचे सत्र रोखण्यासाठी 'शेतकरी स्वालंबन मिशन' आणि 'बळीराजा चेतना प्रकल्प' यांसारखे उपक्रम राबवून समुपदेशन व मदत करण्याचे दावे केले जातात. मात्र, प्रत्यक्ष गावात जावून पाहिले असता, प्रशासकीय यंत्रणा आणि शेतकरी यांच्यात मोठी दरी असल्याचे दिसते. पिकाला कायदेशीर हमीभाव न मिळणे, पीकविमा भरपाई मिळण्यात होणारा विलंब आणि सावकारी पाश यामुळे जानेवारी ते जून २०२६ या अवघ्या सहा महिन्यांत १५२ शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे हे संपूर्ण यंत्रणेच्या अपयशावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे.

## संपादकीय ......

# व्यापारीकरणामुळे शिक्षणाचा फज्जा!

*शिक्षणक्षेत्रातील दिरंगाईवरून राजकीय सत्तेला आव्हान दिल्यानंतर देशातील राजकारणात विशेषतः विरोधकांना यातून नवी उमेद दिसू लागली असताना हा विषय पूर्णपणे राजकीय होऊ पाहत आहे. अशा परिस्थितीत शिक्षण क्षेत्रातील वाढत्या भांडवलशाही, व्यावसायिकीकरणातून शिक्षण क्षेत्राला सोडवण्यासाठी या विषयाचे सामाजिक मूल्य विचारात घेणे गरजेचे आहे. भारतातील सर्वसामान्य नागरिकांना सध्या महागाई, महागडे शिक्षण आणि वाढत्या आर्थिक संकटांचा सामना करावा लागत आहे. यामागे केवळ एकच कारण नसून जागतिक, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक स्तरांवरील विविध घटकांचा एकत्रित परिणाम आहे. युद्ध, इंधनदरवाढीच्या परिणामाकडे बोट दाखवून शिक्षणव्यवस्थेतील अनागोंदी टाळता येणार नाही. धनदांडगे, राजकीय नेत्यांची मालकशाहीतून शिक्षणक्षेत्राला मुक्त करावे लागणार आहे. आजपर्यंत राबवलेल्या शैक्षणिक धोरणातील अपयशही त्यासाठी कारण आहे. खासगी शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. अनेक संस्थांमध्ये शिक्षण ही सेवा नसून तो व्यापार असल्याचे स्पष्ट झाले आहे. सरकारी धोरणेही त्यासाठी पूरक म्हणूनच काम करत आहेत. सरकारी शिक्षण संस्था बंद केल्यास त्यासाठीचे अनुदानही वाचवता येईल, यातून सरकारवर मालकी असलेल्या घटकांच्या शैक्षणिक दुकानदारीसाठी पोषक वातावरण तयार करण्यासाठीचा हा डाव आहे का? म्हणूनच सरकारी आणि अनुदानीत संस्थांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. संस्थापेक्षा सरकारकडे तुलनेने सर्वाधिकार असतात. खरेतर सरकारी, शाळा, महाविद्यालये, आरोग्य केंद्रे किंवा इतर सर्वच सेवा या खासगी संस्थांच्या तुलनेत अधिक सक्षम असायला हव्यात, परंतु आपल्याकडे सरकारी शाळा, महाविद्यालये, दवाखाने खासगी संस्थांच्या तुलनेत कमालीची निकृष्ट दर्जाची जाणीवपूर्वक ठेवली जातात, कारण सरकारी संस्थांमधून भ्रष्टाचाराशिवाय इतर कोणताही मार्ग कमाईचा नसतो. अशा संस्था बंद करणेच सत्तेतील 'व्यावसायिकांसाठी' गरजेचे असते. त्यातूनच संस्थांचे खासगीकरण करण्यावर भर दिला जातो. त्यासाठी खासगी संस्थांमधील कामाची शिस्त आणि नेटकेपणाचे गोडवे गायले जातात, परंतु खासगी घटकांना सार्वजनिक आणि सरकारी घटकांच्या तुलनेत मजबूत करण्यासाठी कोणी आणि का बळ पुरवले ? या मूळ प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जाते.*

*सरकारी शाळा आणि महाविद्यालयांची पुरेशी उपलब्धता नसणे किंवा तेथील गुणवत्तेबाबत असलेल्या साशंकतेमुळे पालकांना नाईलाजाने खासगी शिक्षण संस्थांकडे वळावे लागते. ही गुणवत्ता ढासळण्यामागील कारणांचा शोध जाणीवपूर्वक घेतला जात नाही. सरकारी संस्था सक्षम करणे, हा उद्देशच सत्तेचा नसल्याचे वेळेवेळी स्पष्ट झाले आहे. सरकारकडून चालवल्या जाणार्या अभियांत्रिकी, वैद्यकीय व व्यवस्थापन संस्थांमध्ये मर्यादित जागा असल्याने खासगी संस्थांकडून भरमसाठ फी आकारली जाते. सरकारी संस्थांना जाणीवपूर्वक मर्यादा घालून खासगी संस्थांना चरण्यासाठी कुरण मोकळे केले जाते. शालेय फीसोबतच विविध स्पर्धा परीक्षा आणि इतर उच्च शिक्षणाच्या प्रवेश परीक्षांसाठी द्यावी लागणारी कोचिंग क्लासेसची फी पाहिल्यास डोळे पांढरे होण्याची वेळ यावी. कमालीचे महाग केले जाणारे शिक्षण, हा मोठ्या राजकीय कटाचा भाग असल्याची शंका यावी, इतके शिक्षणाचे बाजारीकरण झालेले आहे. लाखोंच्या घरात असलेले उच्च आणि दर्जेदार शिक्षणाचे शुल्क पाहता, सर्वसामान्य, कामगार, आदिवासी आणि वंचित घटकातील कुटुंबातील विद्यार्थ्यांनी असे उच्च शिक्षण घेऊच नये, अशी व्यवस्था जाणीवपूर्वक करून ठेवली जात आहे. हा देशातील शिक्षण व्यवस्था चालवणार्या नोकरशाही, सत्ता आणि भांडवदारांच्या सर्वव्यापी कटाचा भाग आहे.*

*प्रसंगी कर्ज काढून महागडे शिक्षण घेतले जाते. त्यानंतर दरवर्षी लाखो तरुण पदवीधर होतात, परंतु त्यांच्या कौशल्यानुसार पुरेशा आणि चांगल्या पगाराच्या नोकर्या उपलब्ध होत नाहीत. यामुळे बहुतांश लोकांना कमी पगारात काम करावे लागते. या आधीच कमी असलेल्या पगाराचा मोठा हिस्सा मालकशाहीच्या खिशात जातो, हे स्पष्ट आहे. वेतन किंवा श्रम, बळ, बुद्धीमत्ता, नैपुण्य, कौशल्य आदी गुणांवर आधारित वेतनमान हे स्वप्न झाले आहे. या गुणांपेक्षा वशिला, ओळख, आर्थिक क्षमता आणि दबाव किंवा उपद्रव मूल्यावर संधी हिसकावून घेण्याला महत्व आले आहे. 'शिक्षणासाठी कर्ज' हाच मुळात दूषित आणि शिक्षणाचे व्यापारीकरण करणार्यांनी पोसलेला वाढवलेला विचार आहे. कुटुंबाच्या आधीच्या पिढ्यांवर झालेले कर्ज फेडण्यासाठी शिक्षण आणि त्यातून अर्थार्जनाची संधी, असे हे गणित असायला हवे, मात्र शिक्षणाला धंदेवाईक स्वरुप देणार्या सत्तांना त्यातून आर्थिक शोषणाची संधी मिळणार नाही. त्यामुळे 'शिक्षणासाठी कर्ज' असा उफराटा विचार होत आहे, त्याला सामान्यही बळी पडत आहेत. खासगी विद्यापीठे, संस्थांना नियंत्रणात ठेवण्यासाठी शिक्षणसंस्थांची उद्दीष्टांमध्येच फेरबदल व्हायला हवेत. सरकारी संस्थांच्या गुणवत्तावाढीसाठी धोरणात्मक प्रयत्न वाढवायला हवेत. तरुणांचा देश म्हणून जगात ओळखल्या जाणार्या देशाने शिक्षणव्यवस्थेच्या बाजारीकरणाचा मुद्दा अतिशय गांभीर्याने घ्यायला हवा. अत्याधुनिक दर्जेदार शिक्षणाची गंगा खेडोपाड्यात पोहचवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न व्हायला हवेत. खासगी संस्था महाविद्यालयांच्या फी वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक कायदे करून त्यांची अंमलबजावणी हवी. माणसाला प्रतिष्ठा, सन्मान, बुद्धी आणि अर्थाजनाची समान संधी देण्यासाठी शिक्षण हा त्याचा नैसर्गिक आणि घटनात्मक असा अधिकार आहे. या अधिकाराचे व्यापारीकरण माणूसपणाचे व्यापारीकरण आहे.*

# शिंदी बुद्रूक गाव 'रेड झोन'च्या कक्षेत

## नालीतून गेलेल्या जलवाहिनीचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा ठपका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ पथ्रोट २**

सहा वर्षांअगोदर शिंदी बुद्रूक ग्रामपंचायतकडून सुरू असलेली पाणीपुरवठा योजना पाण्याअभावी बंद पडली. त्यानंतर रहिवाशांनी खासगी बोअर करून पाणीपुरवठा सुरू केला. परंतु सदरची जलवाहिनी नालीमधून घराघरांत पोहोचल्यामुळे पिण्याचे पाणी अयोग्य असल्याचा ठपका ठेवत शासनाने त्यांना 'रेड झोन'च्या कक्षेत उभे केले आहे. अशावेळी भविष्यात नजीकच्या पोही वॉर्डनुसार शिंदी गावात सुद्धा साथरोगाची शक्यता निर्माण झाली आहे. गावात पाणीपुरवठा करण्यासाठी असलेले



ग्रामपंचायतचे बोअर हे पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे आटले. तेव्हा नवीन बोअर करताना २०० फुटांची नियमावली निश्चित केल्याने पाणीपुरवठ्याची व्यवस्था करताना तांत्रिक अडचण निर्माण झाली. परिणामी पाणीपुरवठा बंद पडला. अशावेळी गावातील रहिवाशांनी समूहा-समूहाने एकत्र येत जागा निश्चित करून बोअर केले.

साधारणतः आठ हजार लोकसंख्येच्या गावात पन्नासच्या जवळपास बोअर झाले. त्यावेळी पाणीटंचाईवर तर मात झाली. परंतु सदरची जलवाहिनी रस्त्याच्या कडेला असलेल्या नालीच्या भागातून नेल्यामुळे त्यावर लिकीज होणे, त्याची दुरुस्ती करतेवेळी घाण पाण्याचा पुरवठा घरापर्यंत पोहोचण्याची शक्यता निर्माण झाल्याने पाणी पिण्यायोग्य नसल्याबाबतचा ठपका प्रशासनाने ठेवला आहे. याबाबत त्यांनी २०२२ सालापासून सतत चार वर्षे शिंदी बुद्रूक हे गाव 'रेड झोन'च्या कक्षेत उभे केले आहे. यादरम्यान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने जलजीवन मिशन अंतर्गत शासनाच्या ८३ गावांच्या पाणीपुरवठा योजनेत पाण्याची टाकी उभी करून जलवाहिनी टाकण्याचे काम हाती घेतले आहे. परंतु सदरचे काम अत्यंत संथगतीने सुरू असल्यामुळे पाण्याची टाकी पूर्ण झाल्यानंतरही जलवाहिनीचे काम अर्धवट स्थितीतच आजही कायम आहे. त्यावर ग्रामपंचायतने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाशी वारंवार पत्रव्यवहार करून पाणीपुरवठ्याची योजना लवकर कार्यान्वित करण्याची मागणी केली आहे. परंतु वाढीव निधीच्या मंजुरीनंतरच शिल्लक राहिलेल्या ठिकाणी जलवाहिनीचे काम करून योजना कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. भविष्यात काही विपरीत घडल्यास याला कोण जबाबदार राहणार? असा प्रश्न उभा झाला आहे.

> मागील चार वर्षांपासून ग्रामपंचायतला 'रेड झोन'चे कार्ड मिळालेले आहे. जे अत्यंत चिंताजनक आहे. त्यामुळे सध्या नालीतून गेलेल्या जलवाहिनी वर काढून सुरक्षितरीत्या टाकण्यासंदर्भातील कामे ग्रामपंचायतने स्वतःच खबरदारीचे पाऊल म्हणून करण्याचा निर्णय घेतला आहे.
>
> **वैशाली बोरोडे-वाठ**
> **ग्रामपंचायत अधिकारी,**
> **शिंदी बुद्रूक**

# कोट्यवधींची फसवणूक करणारे दाम्पत्य अटकेत

## मोर्शी येथील प्रकरण, बनावट गुंतवणुकीचे आमिष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ मोर्शी** मोर्शी शहरातील दीप कॉलनी परिसरातील एका महिलेने भरघोस परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांची कोट्यवधी रुपयांनी फसवणूक केल्याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी संबंधित महिला व तिच्या पतीला अटक केली आहे. अविनाश बुरंगे आणि त्याच्या पत्नीला नागपुरातून ताब्यात घेऊन न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना चार ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, सुरवातीला संशयित महिलेने नातेवाईक व परिचितांकडून पैसे घेऊन काहींना ठरल्याप्रमाणे जादा परतावा दिला. त्यामुळे तिच्यावर विश्वास बसलेल्या नागरिकांना 'माझ्या भावाच्या कंपनीत गुंतवणूक केल्यास भरघोस व्याज मिळेल,'





असे सांगून मोठ्या प्रमाणात पैसे गुंतविण्यास प्रवृत्त करण्यात आले. अनेकांनी पाच लाखांपासून दीड कोटी रुपयांपर्यंतची रक्कम दिल्याचे समोर आले आहे. गेल्या पाच ते सात वर्षांपासून हा प्रकार सुरू असल्याचे सांगितले जात आहे. गुंतवणूकदारांनी पैसे परत मागितल्यानंतर संशयितांकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याची तक्रार आहे. काही नागरिकांनी पैसे मागण्यासाठी गेल्यावर मानसिक अस्वस्थतेचे नाटक केल्याचाही आरोप केला आहे. याप्रकरणी अनेकांनी अमरावती ग्रामीणचे पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानंतर सखोल चौकशीचे आदेश देण्यात आले. प्राथमिक तपासानंतर संशयित दाम्पत्याविरुद्ध विविध गुन्हे दाखल करण्यात आले. पोलिस कोठडीत संशयितांनी गोळा केलेली रक्कम नेमकी कुठे गुंतवली, तसेच या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे. ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्शी पोलिस पुढील तपास करीत आहेत. या फसवणुकीमुळे अनेक कुटुंबांची आयुष्यभराची बचत बुडाल्याने गुंतवणूकदारांवर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.

# फायनान्स कंपनीकडून वसुलीचा आरोप

## घर जप्तीच्या धमकीविरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ नांदगाव खंडेश्वर-** नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील पहूर येथील रहिवासी तुळशीदास बन्सीराव जेठे यांनी फायनान्स कंपनीविरोधात अन्यायकारक वसुली, मानसिक त्रास आणि घर जप्तीची धमकी दिल्याचा आरोप करीत जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, जेठे यांनी एका फायनान्स कंपनीकडून एक लाख ३० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. विमा व इतर कपातीनंतर त्यांना एक लाख १५ हजार रुपये धनादेशाद्वारे मिळाले. संबंधित कर्जाची संपूर्ण परतफेड केल्याचा दावा त्यांनी केला



आहे. मात्र, कंपनीच्या एजंटच्या निष्काळजीपणामुळे किंवा आर्थिक गैरव्यवहारामुळे त्यांच्या खात्यात अद्याप थकबाकी दाखविण्यात येत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. याबाबत अनेक वेळा कंपनीशी संपर्क साधूनही समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचा आरोप करीत, उलट पुन्हा पैशांची मागणी करण्यात येत आहे. पैसे न भरल्यास घर जप्त करण्याची धमकी दिली जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे स्वतःला मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचेही त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. याप्रकरणाची सखोल चौकशी करून फायनान्स कंपनी व संबंधित एजंटच्या व्यवहाराची तपासणी करण्यात यावी, भरलेल्या कर्जाची नोंद पडताळून चुकीची थकबाकी तत्काळ रद्द करावी, तसेच घर जप्तीच्या धमक्या व अन्यायकारक वसुली त्वरित थांबवावी, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून न्याय मिळवून द्यावा, अशीही विनंती निवेदनातून करण्यात आली आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

## काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन, विलंब झाल्यास आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ चांदुर रेल्वे-** चांदूररेल्वे तालुक्यात ३० व ३१ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे शेती व पिकांचे मोठे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, या मागणीसाठी माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वाखाली चांदूररेल्वे तालुका व शहर काँग्रेस कमिटीने आज तहसीलदारांना निवेदन दिले. निवेदनात कृषी, महसूल व ग्रामविकास विभागाच्या संयुक्त पथकाद्वारे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून त्वरित नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच शेती खरडून गेलेल्या क्षेत्रासाठी प्रति हेक्टर किमान ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशीही मागणी करण्यात आली. नांदगाव खंडेश्वर, चांदूररेल्वे व धामणगावरेल्वे तालुक्यांत २०० ते २५० मिमी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान



झाले असून अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे कोणताही विलंब न करता पंचनामे पूर्ण करून मदत जाहीर करावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, असे माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनी नमूद केले. शासनाने नुकसानभरपाईचे वितरण तातडीने न केल्यास काँग्रेस पक्ष शेतकऱ्यांच्या न्यायासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला. यावेळी गणेश आरेकर, प्रभाकर वाघ, राजेंद्र राजनेकर, बाळासाहेब ठाकरे, अमोल होले, गोविंद देशमुख, श्रीनिवास सूर्यवंशी, प्रफुल्ल कोकाटे, शिट्टू सूर्यवंशी, अनिसभाई सौदागर, रावसाहेब शेळके, हरिभाऊ ठाकरे, नितीन कोपरकर, दिनेश देशमुख, दत्ता भुयार, राजू लांजेवार, प्रवीण चिचे, गीतेशसिंग ठाकूर, अर्जुन देशमुख, अरुण वाहने, सचिन वाहने, सुधीर नलगे, सक्षम वानखडे, पंकज मेश्राम यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# रासायनिक खत व ॲसिड जप्त; दोघांविरुद्ध गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नांदगाव खंडेश्वर-** नांदगाव खंडेश्वर बसस्थानका जवळ एका वाहनातून विना परवाना कृषी निविष्ठा व रासायनिक खतांची विना परवाना वाहतूक सुरू होती. पोलिसांनी सदर वाहनासह त्यातील माल जप्त केला आहे. संशयित ज्ञानेश रघुनाथ तळेकार (वय ३९), अनंत रघुनाथ तळेकार (वय ४५, दोघेही रा. उत्तमनगर, अमरावती) , या दोघांविरुद्ध फसवणुकीसह रासायनिक खते, नियंत्रण आदेश कायद्यान्वये नांदगावखंडेश्वर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तालुका कृषी अधिकारी संजय नारायण पाटील (वय ५२) यांच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी कृषी अधिकारी यांच्या उपस्थितीत नांदगावखंडेश्वर बसस्थानका जवळ एमएच २७ बीई ९४६८ क्रमांकाच्या कारची तपासणी केली असता त्यामध्ये संशयास्पद कृषी निविष्ठा व रासायनिक खते मिळून आली. तपासणी केली असता, संबंधितांकडे अधिकृत परवाना आढळून आला नाही. रासायनिक खते कॅल्शीयम पाच भरण्या, झिंक १० भरण्या, बोरॉन, अमिनो ॲसिड, मायक्रो न्यूट्रिशियन, असा एकूण १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संशयित ज्ञानेश आणि अनंत तळेकार या दोघांविरुद्ध नांदगावखंडेश्वर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. हा साठा त्या दोघांनी कोठून आणला, याची चौकशी कृषी विभागाने सुरू केली होती.

# चिखलदरा तालुक्याला मिळाले कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी

## डॉ अभिषेक नायडू यांच्या नियुक्तीने आरोग्य यंत्रणेला दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अचलपूर**

मेळघाटातील चिखलदरा तालुक्याला अखेर कायमस्वरूपी तालुका वैद्यकीय अधिकारी लाभल्याने आरोग्ययंत्रणेला मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक दिवसांपासून प्रभारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामकाजानंतर शासनाने डॉ. अभिषेक नायडू यांची कायमस्वरूपी नियुक्ती केल्याने आरोग्यसेवा अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दुर्गम व आदिवासीबहुल भाग असलेल्या मेळघाटातील चिखलदरा तालुक्यात आरोग्य सुविधांवर मोठा ताण असून कायमस्वरूपी तालुका वैद्यकीय अधिकाऱ्याअभावी प्रशासकीय कामकाजात अडचणी निर्माण होत होत्या. मात्र शासनाने नुकत्याच केलेल्या नियुक्त्यांमध्ये चिखलदरा येथील मागील कित्येक वर्षांपासून प्रभारीच्या भरवशावर सुरू असलेल्या तालुका आरोग्य विभागाच्या अधिकारीपदी डॉ. अभिषेक नायडू यांची नियुक्ती केली आहे. या नव्या नियुक्तीमुळे आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी, प्राथमिक आरोग्यकेंद्रांचे समन्वय, तसेच माता-बाल आरोग्य, लसीकरण आणि साथीच्या रोगांवरील नियंत्रण अधिक गतिमान होणार आहे. कायमस्वरूपी अधिकाऱ्याच्या नियुक्तीचे नागरिक, लोकप्रतिनिधी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांकडून स्वागत करण्यात आले .

# वरुड बसस्थानक झाले समस्यांचे आगार

## छताचे प्लॅस्टर कोसळते, पावसात गळती; पिण्याच्या पाण्यापासून सुरक्षेपर्यंत प्रवाशांचे हाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ वरुड-** राज्य परिवहन महामंडळाच्या वरुड बसस्थानकाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून निकृष्ट दुरुस्तीमुळे छताचे प्लॅस्टर कोसळणे, पावसाळ्यात छताला गळती लागणे, पिण्याच्या पाण्याची सुविधा बंद पडणे, स्वच्छतागृहांची दुरवस्था आणि सुरक्षेचा अभाव, अशा अनेक समस्यांमुळे हजारो प्रवाशांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही परिवहन प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महाराष्ट्राच्या पूर्वेकडील आणि अमरावती जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेला वरुड तालुका हा अमरावती, नागपूर, वर्धा तसेच मध्य प्रदेशातील बैतूल आणि पांढूर्णा जिल्ह्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. राष्ट्रीय महामार्गावरील मध्यवर्ती स्थान असल्याने या बसस्थानकातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. सन १९८२ मध्ये उभारण्यात आलेल्या या बसस्थानक व आगाराला तब्बल ४४ वर्षे पूर्ण झाली आहेत. कालांतराने इमारतीची मोठ्या प्रमाणात झीज झाली असून बसस्थानक, आगार, आगार व्यवस्थापकांचे निवासस्थान, चालक-वाहकांचे विश्रामगृह तसेच महिला व पुरुष स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत जीर्ण झाली आहे. दोन वर्षांपूर्वी इमारतीची देखभाल व दुरुस्ती करण्यात आली होती. मात्र, हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप होत असून दुरुस्ती करूनही छताचे प्लॅस्टर वारंवार कोसळत आहे. पावसाळ्यात अनेक ठिकाणी छताला गळती लागत असल्याने प्रवाशांना बसस्थानकात उभे राहणेही धोकादायक ठरत आहे. बसस्थानकातील पाणपोई अनेक दिवसांपासून बंद असल्याने प्रवाशांना पिण्याच्या पाण्यासाठी बाहेर भटकावे लागत आहे. उन्हाळा आणि पावसाळ्यात ही समस्या अधिक तीव्र होते. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# प्रशासनाचा नाकर्तेपणा आणि पोखराचा फोलपणा

# दीड वर्षांपासून भूमिहीनांच्या तोंडाला पुसली पाने


## सरकारची घोषणा फक्त कागदावरच ?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४तिवसा–** राज्य सरकारच्या मोठमोठ्या घोषणा आणि वास्तवातील विदारक चित्र यातील अंतर पुन्हा एकदा उघडे पडले आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (पोखरा) भूमिहीन कुटुंबांना, विधवा, परितक्त्या महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी शेळीपालनासारख्या पूरक व्यवसायाचे गाजर दाखवणाऱ्या प्रशासनाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. सुरुवातीचे काही दिवस अर्जांचा दिखावा केल्यानंतर, गेल्या तब्बल दीड वर्षांपासून ऑनलाइन अर्जप्रक्रिया तांत्रिक कारणांचे तुणतुणे वाजवत पूर्णपणे बंद ठेवण्यात आली आहे. यामुळे हातावर पोट असणाऱ्या शेकडो भूमिहीन कुटुंबांच्या पदरी केवळ घोर निराशा आणि संताप पडला आहे.

भूमिहीन शेतमजूर, महिला आणि सामाजिकदृष्ट्या उपेक्षित घटकांना आर्थिक हातभार लावण्यासाठी तब्बल ७५ ते १०० टक्के अनुदानाची भाषा वापरण्यात आली. अनुदानाची रक्कम थेट बँक खात्यात (ऊद्ढ) जमा करण्याचे दावे करत डीबीटी महापोखरा पोर्टलवरून अर्ज करण्याचे आवाहन खुद्द तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी मोठ्या दिमाखात केले होते.

मात्र, नाव मोठे अन् लक्षण खोटे या म्हणीप्रमाणे प्रत्यक्षात हे पोर्टल दीड वर्षांपासून कुलूपबंद आहे. शेती नसल्यामुळे शेळी–मेंढी पालन किंवा इतर छोटे–मोठे उद्योग करून कुटुंबाचा गाडा हाकण्याचे स्वप्न पाहणाऱ्या महिला आणि भूमिहीन नागरिकांवर सरकारने एकप्रकारे अन्यायच चालवला आहे. आजघडीला महागाईच्या आगीत होरपळणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांना आणि निराधार महिलांना या योजनेकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, प्रशासकीय लालफितशाही आणि




अकार्यक्षमतेमुळे ही महत्त्वाकांक्षी योजना केवळ कागदावरच दम तोडताना दिसत आहे. मंथन नावाखाली चालढकल करणाऱ्या सरकारने आता तरी डोळे उघडून पोखरा योजनेची भूमिहीन अर्जप्रक्रिया तात्काळ सुरू करावी, अशी आक्रमक मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी केली आहे.


तिवसा तालुका कृषी अधिकारी हेमलता इंगळे यांच्याशी यासंदर्भात वारंवार संपर्क साधला असता, भूमिहीन या शब्दाचा नेमका अर्थ कसा लावायचा, यावर वरिष्ठ पातळीवर मंथन सुरू आहे. असे थक्क करणारे उत्तर त्यांच्याकडून दिले जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी केला आहे.

# मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेत अमरावती जिल्हा राज्यात अव्वल

## २.९४ लाख नावे वगळण्याच्या प्रक्रियेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–** मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत अमरावती जिल्ह्याने राज्यात आघाडी घेतली असून, जिल्ह्यातील काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. जिल्ह्यातील एकूण २५ लाख ४५ हजार ६७७ मतदारांपैकी २१ लाख ३७ हजार १७२ म्हणजेच ८३.९५ टक्के मतदारांचे अर्ज डिजिटाइज करण्यात आले आहेत. तसेच २ लाख ९४ हजार ५९१ मतदार ‘असंग्रहित’ (अनकलेक्टेबल) आढळल्याने त्यांची नावे प्रारूप मतदार यादीतून वगळण्याची प्रक्रिया सुरू आहे.जिल्ह्यातील एसआयआर मोहिमेचे एकूण



९५.५३ टक्के काम पूर्ण झाले असून, या कामगिरीमुळे अमरावती जिल्हा राज्यात अव्वल ठरला असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांपैकी दर्यापूर मतदारसंघात ९९.१२ टक्के काम पूर्ण होऊन तो प्रथम क्रमांकावर आहे. तर अमरावती शहर मतदारसंघात ९०.४३ टक्के काम पूर्ण झाले असून ते सर्वात कमी आहे.बीएलओंनी केलेल्या गृहभेटीदरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. जिल्ह्यातील १ लाख ३६ हजार ५०८ मतदार कायमस्वरूपी स्थलांतरित झाल्याचे आढळले. तसेच १ लाख ३ हजार ४०२ मृत मतदारांची नावे अद्याप यादीत कायम होती. याशिवाय ४२ हजार २१७ मतदारांची दुबार नोंदणी झाल्याचे, ११ हजार ५३१ मतदार अनुपस्थित असल्याचे आणि ९३३ अन्य प्रकरणे निदर्शनास आली आहेत. या सर्व मिळून २ लाख ९४ हजार ५९१ नावे मतदार यादीतून वगळली जाणार आहेत.मतदारसंघनिहाय पाहता मोर्शीमध्ये ९०.१० टक्के डिजिटायझेशन व ९७.९७ टक्के एकूण काम पूर्ण झाले आहे. अचलपूरमध्ये ९६.८७, तिवसा ९६.२७, मेळघाट ९४.९९, बडनेरा ९२.४३, अमरावती ९०.४३ आणि धामणगाव रेल्वे मतदारसंघात ९२.१९ टक्के काम पूर्ण झाले आहे.निवडणूक विभागाच्या माहितीनुसार, जिल्ह्याची प्रारूप मतदार यादी ८ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यामध्ये मृत, कायमस्वरूपी स्थलांतरित, दुबार नोंदणी झालेल्या तसेच इतर अपात्र मतदारांची नावे वगळण्यात येतील.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, ज्या मतदारांनी अद्याप गणना अर्ज भरलेला नाही, त्यांनी तातडीने आपल्या बीएलओकडे अर्ज जमा करावा. अन्यथा त्यांचे नाव मतदार यादीतून वगळले जाऊ शकते. त्यामुळे पात्र मतदारांनी ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# अमरावती–नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील जीवघेणे खड्डे तात्काळ बुजविण्याची मागणी

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला निवेदन; अन्यथा रास्ता रोको आंदोलनाचा इशारा..

**दि.४तिवसा विदर्भ प्रजासत्ताक–** अमरावती–नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील पावसामुळे पडलेले जीवघेणे खड्डे तात्काळ बुजविण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) तिवसा तालुक्याच्या वतीने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अमरावती विभागाकडे करण्यात आली आहे. याबाबत प्रकल्प अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अमरावती–नागपूर राष्ट्रीय महामार्गावर दिवस–रात्र मोठ्या प्रमाणात ट्रक, बस, ट्रेलर



व इतर अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते. मात्र, पावसामुळे महामार्गावर अनेक ठिकाणी मोठे व जीवघेणे खड्डे पडले असून त्यामुळे वारंवार अपघात घडत आहेत. नागपूर ते अमरावती मार्गावरील टोलनाक्यांमधून नियमित टोल वसूल केला जात असताना रस्त्याच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.विशेषतः मोझरी बायपास परिसर,मोझरी बसस्थानकाजवळ तसेच वाडेकर पेट्रोल पंपाजवळ मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमुळे मोठ्या अपघाताची शक्यता वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.महामार्गावरील खड्डे तातडीने बुजवून रस्ता सुरक्षित करावा, तसेच तिवसा शहरातील स्ट्रीट लाईट व स्वच्छतेचीही योग्य व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही न केल्यास राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने जनहितासाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.या निवेदनावर जिल्हाध्यक्ष डॉ. सुभाष तवर,तिवसा तालुका अध्यक्ष हेमंत बोबडे, शहराध्यक्ष अजय सुरटकर,तालुका उपाध्यक्ष मंगेश पोल्हाड,तालुका कार्याध्यक्ष पुरुषोत्तम वाते, तालुका सचिव अनिल कडव, कामगार सेलचे तालुका अध्यक्ष आकाश लांजेवार, विलास वावरे,सतीश वानखडे, प्रशांत पांडे आदी उपस्थित होते.

# घनकचऱ्यातील भ्रष्टाचाराची चौकशी करा

## वरुड महाविकास आघाडीचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ वरुड–** शहरातील गोळा केलेल्या ओला व सुखा कचऱ्याचे योग्य पद्धतीने वर्गीकरण न करता मूल्यमापन केल्या जाते. त्याचा अहवाल नगरपरिषद प्रशासनाकडे सादर केला जातो. परंतु, या मूल्यमापनात सतत अनियमितता होत असून यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याने याचा आर्थिक ताण शहरातील नागरिकांना सोसावा लागत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे याप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाविकास आघाडीने दिलेल्या निवेदनातून केली आहे. २०१४ पासून स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ भारत सुंदर भारत अभियान संपूर्ण देशात राबविले जात आहे. यावर शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्च केल्या जात आहेत. या योजनेंतर्गत संपूर्ण शेंदूरजनाघाट नगरपरिषद क्षेत्रातील ओला व सुखा कचरा घंटागाडी आणि ट्रॅक्टरच्या साहाय्याने कंत्राटी पद्धतीने गोळा



केला जात आहे. परंतु, गोळा करण्यात आलेल्या कचरा डेपोवर याचे योग्य पद्धतीने मूल्यमापन न करता चुकीच्या पद्धतीने मूल्यमापन करून शासनाची दिशाभूल केली जात आहे. तसेच ज्यादा पैसे उकळल्या जात आहेत असा आरोप आहे. त्याचा आर्थिक भुर्दंड शहरातील सर्वसामान्य नागरिकांना सोसावा लागत आहे. दररोज अंदाजे आठ ते १० टन कचरा गोळा होत असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. परंतु, ही माहिती संशयास्पद असल्याने याबाबत सखोल चौकशीचे आदेश देऊन खरच इतक्या मोठ्या प्रमाणात शहरातील घनकचरा गोळा होतो का? यावर चिंतन करणे गरजेचे आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर दंडात्मक कारवाई करावी व शहरातील नागरिकांच्या खिशावर येणारा ताण कमी करावा, अशी मागणी महाविकास आघाडीकडून निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अशाप्रकारे अनियमितता पुन्हा आढळून आल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारासुद्धा देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक संजय डफरे, काँग्रेसचे शहराध्यक्ष पवन बेलसरे, अनिल आंडे, शिवसेनेचे कपिल तरार यांच्यासह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शालेय परिसरातून तळलेले पदार्थ, जंकफूड होणार गायब

## एफडीएच्या निर्णयाचे पालकांमधून स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४यवतमाळ–** एफडीचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी शालेय परिसरातून तळलेले विक्री होणारे पदार्थ जसे वडापाव, कांदा भजी, बटाटा भजी, समोसे, चॉकलेट्स, जंक फूड विकण्यावर पूर्णपणे बंदी घातली आहे.



त्यामुळे आर्णी तालुक्यातही शालेय परिसरातून तळलेले पदार्थ गायब होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, या निर्णयाचे पालकवर्गांतून स्वागत होत आहे. बहुतांश शाळा–महाविद्यालय परिसरात तळलेले पदार्थ, जंक फूड मोठ्या प्रमाणात विकल्या जातात.

हे पदार्थ विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी हानीकारक आहे. परंतु आता एफडीचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी शाळेपासून पन्नास मिटरच्या आतमध्ये असे पदार्थ विक्रीवर प्रतिबंध घातला असल्याने या निर्णयाचे पालकांमधून स्वागत केले जात आहे. विद्यार्थ्यांच्या शरीराला बाधा निर्माण होण्याचा धोका लक्षात घेता शालेय परिसरातून तळलेले पदार्थ विक्रीलाच लगाम घातलेला असल्यामुळे एफडीचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या या निर्णयाचे पालकांनी कौतुक केले आहे. शालेय परिसरातून तळलेले पदार्थ व एर्नर्जी ड्रिंक, चॉकलेट्स, जंक फूड विक्री करणार्!

यांवर कठोर अन् कडक कारवाई करण्यात येणार आहे. ही कारवाई अन्न औषध प्रशासन अधिकारी व पोलिस प्रशासन संयुक्तरीत्या करणार आहेत. एफडीएच्या या निर्णयाचे पालकवर्गातून स्वागत होत असल्याचे दिसत आहे.

# ‘फूड लायसन्स’ काढा, अन्यथा दंड भरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ यवतमाळ**

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत पात्र संपूर्ण शाळांना आता ‘फूड लायसन्स’ अनिवार्य करण्यात आले आहे. या संदर्भात प्राथमिक शिक्षणाधिकार्!यांनी मागिल महिन्यात सोळाही गटशिक्षणाधिकार्!यांना एका पत्रान्वये निर्देश दिले आहेत. शहरातील तसेच लगतच्या परिसरातील शाळांना ‘फूड लायसन्स’ काढण्यास सकारात्मकता दाखविली. परंतु ग्रामीण भागात आताही निरुत्साह आहे. तपासणी ‘लायसन्स’ आढळून न आल्यास दंडसुद्धा भरण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील एकूण दोन हजार ७५० हून अधिक शाळांमधील पहिली ते पाचवीच्या पावणेदोन लाखांवर विद्यार्थ्यांना पोषण आहार शिजवून



दिल्या जात आहे. परंतु हा पोषण आहार सकस, सुरक्षित आणि निर्भेळपणे देणे आवश्यक आहे. मात्र, बर्!याचवेळा पोषण आहार देण्यात गडबड होत असल्याचे समोर आले आहे. आवश्यक सोयी सुविधांयुक्त पोषण आहार देण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची आहे. तर अन्न सुरक्षा व मानके कायद्यान्वये ‘फूड लायसन्स‘ घेणे आवश्यक आहे. या संदर्भातचे आदेश मागिल शैक्षणिक वर्षांतच काढण्यात आले होते. मात्र, कोणत्याही शाळेने हा परवाना काढलाच नाही. मध्यंतरी शिक्षण संचालकांनी पत्र काढून प्राथमिक शिक्षणाधिकार्!यांना सूचना दिल्या होत्या. त्या सूचनेनुसार जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने १४ जुलै २०२६ ला दुसर्!यांदा पत्र काढून सोळाही बीईओंना सूचना दिल्या आहेत. या सूचनेनंतरही परवाना काढला नाही, तर पाच लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होण्याची शक्यता आहे. प्रधानमंत्री पोषणशक्ती योजनेस पात्र संपूर्ण शाळांना ऑनलाइन परवाना काढून घ्यावा, असे स्पष्ट निर्देश शिक्षण विभागाने दिले आहे.

> पोषणशक्ती निर्माण योजनेतील सर्व पात्र शाळांना परवाना काढणे बंधनकारक आहे. अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या असून, काही तालुक्यातील शाळांनी परवाना काढणे सुरू केले आहे. तसेच ‘एचएफएसएस’ पदार्थ प्रतिबंधित असल्याबाबतचे पत्रसुद्धा काढण्यात येणार आहे.
>
> **– प्रकाश मिश्रा** शिक्षणाधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग.

### शासकीय, खासगी शाळांना निर्देश; काही तालुक्यात सुरवात

### ‘एचएफएसएस’ पदार्थ प्रतिबंधित

अन्न व औषध प्रशासन विभागाची सूत्रे हाती घेतल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी हॉटेल्स, पानठेला चालकांवर धाडसत्र राबविले. असे असताना आता शाळेच्या आवारात संतृप्त चरबी, ट्रान्स फॅट, अतिरिक्त साखर अथवा सोडियमचे प्रमाण अधिक असलेले (एचएफएसएस) अन्नपदार्थ शाळा तसेच आवारातही प्रतिबंधित केले आहे. त्या पद्धतीचा फलक शाळेच्या प्रवेशव्दारावर प्रदर्शित करावा, असेही निर्देश दिले.

# संस्थेचे ४८ लाख रुपयांचे देयकच रखडल्याने श्वानांची नसबंदी ठप्प

### शहरामध्ये दहशत कायम : ४ वर्षांत फारच मोजक्या श्वानांची नसबंदी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती** शहरात मोकाट श्वानांची नसबंदी करणाऱ्या संस्थेचे देयक रखडल्यामुळे मार्चपासून श्वानांची नसबंदी, लसीकरण ठप्प असून शहरातील श्वानांची संख्या सध्या अनियंत्रितपणे वाढत आहे. नसबंदी करणाऱ्या संस्थेचे ४८ लाखांचे देयक रखडले असून त्याला मनपाच्या स्थायी समितीनेही या प्रकरणी ऑडिटवर देयक स्थगित ठेवण्याचे आदेश दिले होते.

शहरात मोकाट श्वानांची दहशत दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळे सर्वसामान्य जेरिस आले आहेत.शहरात हजारो श्वान असताना ४ वर्षांत प्रत्येकी १ हजार श्वान यानुसार ४ हजार श्वानांची नसबंदी करण्यात आली होती. अशी, माहिती पशु वैद्यकीय विभागाने सभागृहात दिली होती. अजुनही मनपाकडे ना शेल्टर हाऊस आहे, ना मोकाट श्वान पकडण्यासाठी परिणामकारक योजना. त्यामुळे या प्रकरणी कोणताही प्रभावी उपाय झाला नाही. तसेच श्वानांची नसबंदी व ॲण्टी रॅबिज फारसा प्रतिसाद मिळाला नाही. लसीकरण निविदा प्रक्रियेलाही त्यामुळे अजुनही अमरावती मध्ये श्वानांची नसबंदी ठप्प आहे.–

# उपजिल्हाधिकारी ‘सामान्य’ पद रद्द

## राज्यभरात आता फक्त ’उपजिल्हाधिकारी महसूल’ हेच पद राहणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३मुंबई–** राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने जिल्हास्तरावरील प्रशासकीय पदनामांमधील गोंधळ दूर करण्यासाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार, ’उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन)’ हे पद रद्द करण्यात आले असून, आता राज्यभरात केवळ ’उपजिल्हाधिकारी (महसूल)’ हेच पद अस्तित्वात राहणार आहे. या बदलामुळे प्रशासकीय कामकाज अधिक लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा आहे. यापूर्वी, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये ’उपजिल्हाधिकारी (महसूल)’ आणि ’उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन)’ अशी भिन्न पदनामे होती. यामुळे शासकीय कामकाजात आणि नागरिकांमध्ये गोंधळ निर्माण होत असे. ही भिन्नता दूर करण्यासाठी शासनाने ’सामान्य प्रशासन’ हे पदनाम रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. पदनामातील या बदलासोबतच, प्रशासनाने अधिकाऱ्यांच्या कामांची विभागणी अधिक स्पष्ट केली आहे. निवासी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे आता शस्त्र, सिनेगृह व व्हिडिओ गृह परवाने, नैसर्गिक आपत्ती व मदत वाटप, टंचाई, पीक विमा, तसेच ’आपले सरकार’ आणि ’पी.जी. पोर्टल’वरील ऑनलाइन तक्रार निवारणाची मुख्य जबाबदारी असेल. याव्यतिरिक्त, सेतू केंद्र, सामाजिक अर्थसहाय्य योजना आणि कायदा व सुव्यवस्था यांसारखी महत्त्वाची नागरी कामेही त्यांच्या अखत्यारीत येतील. दुसरीकडे, उपजिल्हाधिकारी (महसूल) यांच्याकडे प्रामुख्याने जमिनीशी संबंधित महत्त्वाची कामे सोपवण्यात आली आहेत. यात भोगवटदार वर्ग–२ जमिनी वर्ग–१ करणे, जमिनींच्या विक्रीची परवानगी, नागरी व ग्रामीण भागातील सरकारी आणि सीटीएस जमिनींचे व्यवस्थापन, तसेच विकास परवानग्यांचा समावेश आहे. आदिवासी जमिनी, भूदान, कुळ, नझुल, सीलिंग व इनाम जमिनींचे प्रश्न, वनहक्क, पेसा कायदा, महाराजस्व अभियान आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका हाताळण्याची जबाबदारीही उपजिल्हाधिकारी (महसूल) यांच्यावर असेल.या निर्णयामुळे नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. आतापर्यंत वेगवेगळ्या पदनामांमुळे नागरिकांना आपले काम नेमक्या कोणत्या अधिकाऱ्याकडे आहे हे समजणे कठीण जात होते. आता राज्यभरात एकच पदनाम राहिल्याने नागरिकांची दिशाभूल थांबेल.

## स्मार्ट मीटरच्या वाढीव वीज बिलाविरोधात

# तळेगाव दशासार येथे काँग्रेसचा महावितरण कार्यालयावर मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४धा.रेल्वे –** स्मार्ट मीटरमुळे नागरिकांना वाढीव वीज बिले येत असल्याच्या निषेधार्थ तळेगाव दशासार येथे काँग्रेसचे माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वाखाली महावितरण कार्यालयावर नागरिकांचा मोर्चा काढण्यात आला. स्मार्ट मीटर बसविल्यानंतर दरमहा ५०० ते ७०० रुपये वीज बिल येणाऱ्या अनेक ग्राहकांना अचानक ३ ते ४ हजार रुपयांची बिले आल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत होता. याबाबत वारंवार तक्रारी करूनही महावितरणकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने तळेगाव दशासार ग्राम काँग्रेस कमिटीच्या



वतीने आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला.मोर्चादरम्यान माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनी नागरिकांच्या वतीने महावितरणच्या अधिकाऱ्यांसमोर वाढीव वीज बिलांचा प्रश्न ठामपणे मांडला. नागरिकांच्या आक्रोशाची दखल घेत महावितरणच्या अधिकाऱ्यांनी संबंधित वाढीव वीज बिलांची तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करण्यात येईल तसेच सुधारित नवीन वीज बिले देण्यात येतील, अशी हमी दिली. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक व काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. स्मार्ट मीटरमुळे सर्वसामान्यांवर आर्थिक भार पडत असल्याचा आरोप करत, अन्यायकारक वीज बिलांचा प्रश्न तातडीने निकाली काढावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

# अमरावती मनपाची ‘झाडाझडती’

## खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे यांची ७ ऑगस्टला मॅरेथॉन बैठक

### प्रशासनाला धरणार धारेवर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि ४अमरावती** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या गतिमान शासन व पारदर्शक प्रशासनाच्या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने अमरावती महानगर पालिकेच्या कामकाजा ची सखोल समीक्षा करण्यासाठी राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे आणि विधानपरिषद आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या पुढाकाराने शुक्रवार, ७ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता मनपा आयुक्त दालनात मॅरेथॉन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बैठकीत महापौर श्रीचंद तेजवानी, मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदवले, वरिष्ठ अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. अमरावती व बडनेरा परिसरातील नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचे निराकरण, प्रलंबित विकासकामांचा आढावा, मनपाचे उत्पन्न वाढवून आर्थिक सक्षमता निर्माण करणे तसेच शहरातील विविध नागरी समस्यांवर ठोस निर्णय घेण्यावर बैठकीत भर दिला जाणार आहे.शहरातील स्वच्छता व्यवस्था, उघड्यावर होणारी मांसविक्री रोखणे, हॉकर्स झोन निश्चित करून नोंदणी प्रक्रिया, पादचारी फुटपाथ अतिक्रमणमुक्त करणे, वाहतूक शिस्तबद्ध करण्यासाठी ट्रॅफिक सिग्नलच्या कालावधीत आवश्यक बदल, खाजगी रुग्णालयांतील मेडिकल वेस्टची विल्हेवाट, हॉटेल्स व लॉन्समधील उरलेल्या अन्नाची योग्य विल्हेवाट, प्रत्येक प्रभागातील कचरा संकलन व्यवस्था, वृक्षतोडीवर नियंत्रण, मनपाच्या मालकीच्या मोकळ्या जागा व सार्वजनिक मैदानांची स्वच्छता, पावसाळ्यात साथीचे आजार रोखण्यासाठी उपाययोजना, उद्यानांची देखभाल, अतिक्रमण विभागाचे कामकाज, शहर सौंदर्यीकरण, देशी वृक्ष लागवड, मनपाचे मनुष्यबळ, कंत्राटी व्यवस्था तसेच मंजूर व रखडलेल्या विकासकामांची गुणवत्ता आणि खर्च यांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी सांगितले की, ही बैठक केवळ औपचारिकता नसून शहराच्या विकासासाठी निर्णायक ठरेल. नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, प्रशासकीय अडथळे दूर करणे, अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींमध्ये समन्वय वाढविणे तसेच राज्य शासनाकडून अधिकाधिक निधी मिळविण्यासाठी आवश्यक विषयांचे संकलन करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रभावी पाठपुरावा केला जाणार आहे.जनहिताच्या प्रत्येक मुद्द्यावर सखोल चर्चा करून अमरावतीच्या रखडलेल्या विकासाला गती देण्यासाठी ठोस निर्णय घेतले जातील, असा विश्वासही प्रवीण पोटे पाटील यांनी व्यक्त केला.

# सुनेत्रा पवारांवरील वक्तव्यावरून नवनीत राणांचा संताप

## पृथ्वीराज चव्हाणांनी महिलांची माफी मागावी



**विदर्भ प्रजासत्ताकदि.४अमरावती**
२२काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्यावरून राजकीय वातावरण तापले असून, माजी खासदार नवनीत राणा यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.नवनीत राणा यांनी आपल्या ट्विटमध्ये पृथ्वीराज चव्हाण यांच्या वक्तव्याचा निषेध करत ते अत्यंत नीच, लाजिरवाणे आणि स्त्री जातीचा अपमान करणारे असल्याचे म्हटले आहे. त्यांनी काँग्रेसवर टीका करत, स्वतःला सुसंस्कृत म्हणवणाऱ्या काँग्रेसच्या नेत्यांची भाषा इतक्या खालच्या पातळीवर घसरली आहे का? असा सवाल उपस्थित केला.राणा यांनी पुढे म्हटले की, एका कर्तृत्ववान महिलेचा अपमान करून काँग्रेसने आपली विकृत मानसिकता पुन्हा एकदा दाखवून दिली आहे. सार्वजनिक जीवनात महिलांविषयी सन्मानाची भाषा वापरणे ही प्रत्येकाची जबाबदारी असून, अशा प्रकारच्या वक्तव्यांना समाजात स्थान नसल्याचे त्यांनी नमूद केले.याचबरोबर पृथ्वीराज चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह महाराष्ट्रातील सर्व महिलांची तात्काळ जाहीर माफी मागावी, अशी मागणीही नवनीत राणा यांनी केली आहे.दरम्यान, या वक्तव्यावरून राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे असून, विविध पक्षांकडूनही प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये पुन्हा एकदा शाब्दिक संघर्ष तीव्र होण्याची शक्यता आहे.

# तिवसा बसस्थानकासमोर थार व बोलेरो पिकअपची भीषण धडक




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४तिवसा** अमरावती–नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर तिवसा बसस्थानकासमोर मंगळवारी (दि. ४ ऑगस्ट) दुपारी सुमारे ३.३० वाजताच्या सुमारास महिंद्रा थार आणि बुलेरो पिकअप वाहनामध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी अथवा दुखापत झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला. मिळालेल्या माहितीनुसार, अमरावतीच्या दिशेने जाणारी महिंद्रा थार (क्र. एमएच १४ केएन ५६७८) ही चारचाकी गाडी तिवसा बसस्थानकासमोरील स्पीड ब्रेकरवरून जात असताना चालकाने वाहनाचा वेग कमी करून ब्रेक लावले. त्याचवेळी मागून भरधाव वेगाने येत असलेल्या मालवाहू बुलेरो पिकअप (क्र. एमएच ४० वाय ४२८१) ने थारला जोरदार धडक दिली.धडकेची तीव्रता इतकी होती की, थार वाहन काही अंतर घासत गेले. त्यामुळे वाहनाचा मागील टायर फुटला तसेच इतर भागांचेही मोठे नुकसान झाले. दरम्यान, धडकेनंतर बुलेरो पिकअपवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन महामार्गावरील लोखंडी दुभाजकावर जाऊन अडकले.

विशेष बाब म्हणजे, अपघात झाला त्यावेळी शाळा सुटण्याची वेळ असल्याने परिसरात विद्यार्थ्यांची व नागरिकांची वर्दळ होती. अशा परिस्थितीतही कोणालाही इजा झाली नाही. त्यामुळे मोठी दुर्घटना टळल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

अपघाताची माहिती मिळताच तिवसा पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वाहतूक सुरळीत करण्यासह पंचनामा व इतर आवश्यक कार्यवाही केली. या अपघातात कोणतीही जीवितहानी किंवा जखमी झाल्याची नोंद नसून, पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहेत.

# कोणार्क कंपनी घोटाळा :दंड कमी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती,**महापालिकेच्या स्वच्छता कंत्राटासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कोणार्क कंपनीवर आकारण्यात आलेला दंड परस्पर कमी केल्याचा गंभीर आरोप करत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. स्वच्छता कंत्राटातील सुमारे ३०० कोटी रुपयांच्या कथित भ्रष्टाचारप्रकरणी सुरू असलेली विभागीय चौकशी तातडीने पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी करत सामाजिक कार्यकर्ते मुन्ना राठोड आणि समीर जवंजाळ यांनी विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त तसेच सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात आज तक्रारी दाखल करण्यात आली. तक्रारीत नमूद केल्यानुसार, कोणार्क कंपनीवर नियमांनुसार आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम अधिकाऱ्यांनी परस्पर कमी करून कंपनीला आर्थिक लाभ मिळवून दिल्याचा आरोप आहे. या निर्णयामुळे महापालिकेच्या महसुलाचे नुकसान झाल्याने संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर फौजदारी तसेच विभागीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, या स्वच्छता कंत्राटातील कथित भ्रष्टाचाराबाबत १० जुलै २०२६ रोजी आमदार धीरज लिंगाडे आणि आमदार संजय खोडके यांनी विधिमंडळात लक्षवेधी सूचना मांडली होती. मात्र, तीन आठवडे उलटल्यानंतरही मंत्रालयाकडून चौकशीचे अधिकृत पत्र विभागीय आयुक्त कार्यालयाला प्राप्त झाले नसल्याचा दावा तक्रारकर्त्यांनी केला आहे. शासनाचा हा विलंब कोणाला संरक्षण देण्यासाठी आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. संबंधित मंत्र्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन चौकशी प्रक्रिया गतीमान करावी, अशी मागणीही करण्यात आली.सार्वजनिक निधीचा अपव्यय, नियमांचे उल्लंघन आणि दोषींना संरक्षण देण्याचा कोणताही प्रयत्न अमरावतीकर सहन करणार नाहीत, असा इशारा तक्रारकर्त्यांनी दिला. संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कडक फौजदारी आणि विभागीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी पुन्हा केली.तसेच, योग्य वेळी ठोस कारवाई झाली नाही तर अमरावतीत व्यापक जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही मुन्ना राठोड आणि समीर जवंजाळ यांनी प्रशासनाला दिला आहे. त्यामुळे कोणार्क कंपनीच्या स्वच्छता कंत्राटातील कथित गैरव्यवहाराचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून, आता प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# २४ कामांच्या जागेचा प्रश्न सुटता–सुटेना

## जलजीवन मिशनमधील कामे; दानपत्राचे प्रस्ताव पडून




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४यवतमाळ**
जलजीवन मिशनमधील प्रस्तावित २४ कामांच्या जागेचा प्रश्न तब्बल तीन ते चार वर्षांपासून सुटला नाही. काही गावात दानपत्र, तर काही ठिकाणी पर्यायी जागा उपलब्ध नाही. परिणामी, प्रत्यक्षात कामांना सुरवात होऊ शकली नाही. सर्वाधिक सहा गावात उमरखेड तालुक्यातील आहेत. जलजीवन मिशनची योजना कार्यान्वित करून जवळपास सहा वर्षांचा कालावधी लोटला आहे. प्रत्यक्षात फेब्रुवारी २०२२ मध्ये कामांना सुरवात झाली. तब्बल दीड हजारांहून अधिक गावात ही योजना मंजूर झाली आहे. यात नवीन पाण्याची टाकी, विहीर, नळ जोडणी आदी कामे प्रस्तावित करण्यात आली. केंद्र शासनाची अतिशय महत्त्वाकांशी योजना आहे. या योजनेत प्रस्तावित असलेल्या काही गावात जागेची समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. बर्याच ठिकाणी दानपत्रावर जागा घेण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. ही प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता मोठी कसरत प्रशासनाला करावी लागली. तरीसुद्धा चार वर्षांपासून अनेक गावातील जागेचा प्रश्न प्रशासन सोडवू शकले नाही. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकार्‌!यांनी वेळोवेळी अधिकार्‌!यांच्या बैठका घेतल्या. बर्‌!याच प्रकरणात जिल्हाधिकार्‌!यांच्या माध्यमातून उपविभागीय अधिकारी, तहसीलदारांना थेट सूचना देण्यात आल्या. मध्यंतरी काही ठिकाणच्या जागेच तिढा सोडवून घेण्यात प्रशासनाला यश आले. परंतु मागिल चार वर्षांत जिल्ह्यातील २४ गावातील जागेच प्रश्न सुटलेला नाही. यात दारव्हा, दिग्रस, पुसद, वणी, यवतमाळ, झरीजामणी या तालुक्यातील प्रत्येकी एक, कळंब तालुक्यात दोन, आर्णी, राळेगाव, नेर तालुक्यात प्रत्येकी तीन आणि एकट्या उमरखेड तालुक्यात तब्बल सहा गावांचा समावेश आहे. बहुतांश गावातील दानपत्र, पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात आली नाही. परिणामी, कामे पूर्णत: ठप्प पडली आहे. याकरिता जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंत्यांनाच विशेष पावले उचलून तोडगा काढावा लागणार आहे. अन्यथा योजना ठप्प पडण्याच्या मार्गावर आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांकडे चार गावातील प्रस्ताव

उमरखेड तालुक्यातील चार गावातील प्रस्ताव उपविभागीय कार्यालयाच्या माध्यमातून निकाली काढण्यात आले आहेत. परंतु तहसीलस्तरावरील त्रुटी निर्माण झाली आहे. दरम्यान, तहसीलस्तरावरून त्रुटीची पूर्तता करण्यात आली असून, जिल्हाधिकार्‌!यांकडे मंजुरीकरिता प्रकरण दाखल करण्यात आले आहे. विशेष म्हणजे यातील तीन प्रकरणे डिसेंबर २०२२, तर एक प्रकरण ऑक्टोबर २०२२ मध्ये दाखल करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

### तालुकानिहाय जागा न मिळालेले गावे

आर्णी – सुभाष नगर, विठोली, झापरवाडी दारव्हा – डोल्हारी दिग्रस – साखरा कळंब : मार्केंडा, पाढरी (न.), महागाव – दहीसरवाडी पुसद – म्हसोला राळेगाव – वाटखेड, धानोरा, कृष्णापूर उमरखेड – निंगणूर, निंगणूर (साखरवाडी), सेवा नगर, नवीन वालतूर, खरबी, तिवडी वणी – परसोडा यवतमाळ – रोहटेक झरीजामणी – परसोडी नेर – मालखेड (खु.), पिंपळगाव काळे, गोंदगव्हाण.

# अमरावती महानगरपालिका

## आयुक्तांच्या नावाने व्हॉट्सॲपवर आर्थिक फसवणुकीचा प्रयत्न

### नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती,**
अमरावती महानगरपालिका आयुक्त यांच्या नावाचा गैरवापर करून अज्ञात व्यक्तीकडून नागरिकांकडे पैशांची मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. यासाठी +६६६२४२७८१०० या व्हॉट्सॲप क्रमांकाचा वापर केला जात असल्याची माहिती समोर आली आहे.महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, आयुक्तांच्या नावाने कोणत्याही प्रकारे व्हॉट्सॲप किंवा इतर माध्यमातून आर्थिक मदतीची अथवा पैशांची मागणी केली जात नाही. त्यामुळे अशा प्रकारचे संदेश किंवा कॉल प्राप्त झाल्यास त्यावर विश्वास ठेवू नये आणि कोणत्याही परिस्थितीत पैसे पाठवू नयेत.तसेच +६६६२४२७८१०० किंवा अशाच प्रकारच्या इतर कोणत्याही संशयास्पद क्रमांकावरून आयुक्तांच्या नावाने संदेश आल्यास त्वरित सायबर गुन्हे शाखेकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.अशा फसवणुकीच्या जाळ्यात अडकू नये, संशयास्पद संदेशांची खातरजमा करावी आणि नागरिकांनी अधिक सतर्क राहावे, असे आवाहन अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले यांनी केले आहे.

# मायेचे अनोखे दान! सासूच्या किडनीमुळे जावयाला मिळाले नवजीवन दान





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**
स्थानिक विभागीय संदर्भ सेवारुग्णालय ( सुपर स्पेशलिटी) हॉस्पिटल अमरावती. येथे ७५ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली.सदर रुग्ण हा काही महिन्यांपासून किडनी आजाराने त्रस्त होता. दहा वर्षांपूर्वी रुग्णाचे मुंबई येथे एक किडनी प्रत्यारोपण झाले होते. पण काही कारणाने दहा वर्षानंतर पुन्हा रुग्णाची किडनी निकामी झाली. त्यासाठी बाहेर उपचार पद्धती चालू होती व काही महिन्यांपासून डायलिसिस करत होता . तेव्हा डॉक्टरांनी रुग्णास व त्याच्या कुटुंबियांस विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ,अमरावती येथे आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य शस्त्रक्रिया यासाठी रुग्ण विविध जिल्ह्यांमधून नव्हे तर इतर राज्यामधून सुद्धा येत असतात याविषयी महिती दिली. तेव्हा आज रुग्णालयात झालेले ७५ वे किडनी प्रत्यारोपण, हे ४० वर्षीय देवानंद किसन चव्हाण यांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. सदर रुग्ण हा रा. पारडी ता. अचलपूर , जि. अमरावती येथील रहिवासी असून मागील काही महिन्यांपासून डायलिसिस चालु होते. मात्र डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले त्यावेळी जावयाच्या व मुलीच्या पुढील भविष्याचा विचार करून सासू रंजना श्रीराम सोळंके (५५) यांनी आपली एक किडनी जावई देवानंद ला देण्याचा निर्णय घेतला, व आपली एक किडनी देवानंद ला देऊन त्याला नवीन जीवन दिले. ही शस्त्रक्रिया अत्यंत जटिल व गुंतागुंतीची होती जी रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांच्या चमूने यशस्वीरित्या पार पाडली. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली. सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. हितेश गुल्हाने , युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ. प्रतिक चिरडे ,डॉ विशाल बाहेकर , डॉ. राहुल घुले ,बधिरिकरण तज्ञ– डॉ. रोहित हातगावकर, डॉ दिपाली देशमुख , डॉ.अश्विनी मढावी, डॉ शीतल सोळंकी, डॉ. चेतन रोंधे, डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे,डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय,डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव,समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी,महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने मधील एम.सी.ओ.डॉ. पायल रोकडे ,डॉ. दिव्यांनी मुंदाने, कल्याणी गाढवे त्याचप्रमाणे अधीसेविका चंदा खोडके व मालती प्रधान यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर ज्योती तायडे, सरला राऊत, निलिमा मलवार, वैष्णवी निकम, माधुरी सोनटक्के, दीपाली तायवाडे, अक्षय पवार,कीर्ती तायडे, यशोधरा नेवाडे , मयुरी खेरडे, ओम महल्ले ,अनु वडे,योगिश्री पडोळे,वैशाली ढोबळे, कोमल भालेकर, रुपाली गवई , दीक्षा बेलखेडे, अर्चना मढावी ,वैष्णवी टाकरखेडे, नम्रता दामले, डायलिसिस विभागातील अनिल सूर्यवंशी, मीनल तायडे, शैलेश राऊत, सोनू ढेमरे, निखिल काळे, परवेझ अहमद, आहारतज्ञ कविता देशमुख, रश्मिता दिघडे, श्रीधर ढेंगे, औषध विभागामधील योगेश वाडेकर, अमोल वाडेकर, शुभम वरघडे , पंकज बेलुरकर , सुनीता ठाकूर ,अविनाश राठोड, ,गजानन मातकर, रूपेश हरडे,आशिष थुल, आशिष मिश्रा,राहुल चव्हाण,रंजना दिपटे, मंगला भेंडकर, इंदू पाटील, गजानन चौधरी,प्रशांत थेटे, निलेश आत्राम, इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विषेश सहकार्य होते